ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.891(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | July 2021 Issue-78, Vol-02 | 082

**20**

# सार्क संघटना आणि भारत पाकसंबंध एक विश्लेषण

**डॉ. डोंगरे एल.बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, ता. हिमायतनगर, जि. नांदेड

**********

भारतावर ब्रिटिशांनी जवळपास दिडशे वर्ष राज्यकारभार केला होता. फोडा आणि राज्यकरा हे ब्रिटिश राजकारणाचे महत्वाचे वैशिष्टचे राहिले आहे. आपण येथून गेल्यानंतर ही भारत एक बलाढय राष्ट्र म्हणुन पुढे येवु नये या हेतुने हिंदु—मुस्लीम धार्मिक भावनांना खतपाणी घालून द्विराष्ट्रवादाची संकल्पणा व जिनांच्या माध्यमातुन पुढे आणली ०३ जून १९४७ रोजी ब्रिटिश सरकारने भारताच्या फाळणीची घोषणा केली. फाळणाच्या कार्यक्रमानुसार भारतातल्या संस्थानिकांना त्यांच्या इच्छेनुसार भारत आणि पाकिस्तानात सामिल होण्याचे स्वातंत्र्य दिले या नुसार भारतातुन पाकिस्तान हा देश निर्माणझाला सिंधु नदीच्या उत्तरेकडील काश्मिरचा भाग राजा हरीसिंग यांच्या हवाली केला. कालातरांने राजा हरीसिंगाने काश्मिरला भारतात विलिन केल. घटनेच्या कलम ३७० नुसार जम्मु आणि काश्मिरला भारत सरकारने विशेष दर्जा दिला. हेच जम्मु आणि काश्मिर भारत आणि पाकमधील संघर्षाचा आणि तणावाचा विषय बनला होता. फाळणीनंतर पाकने लगेच जम्मु काश्मिरसाठी भारतावर हल्ला केला होता. जम्मु काश्मिर मुळेच १९४७, १९६५, १९७१, १९९९ अधी चारवेळा भारत आणि पाकमध्ये संघर्ष झाली. भारत आणि पाकमधील संघर्षाचे मुख्य कारण असलेला जम्मु आणि काश्मिरला प्रश्न तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या पातळीवर न सोडवता तो प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेत नेला.

सुरक्षा परिषेदत असणाऱ्या अमेरीका आणि चिन सारख्या महासत्तावान राष्ट्रांनी तो प्रश्न सोडवीण्या ऐवजी त्यास आधिक गुंतागुंतीचा आणि आंतरराष्ट्रीय विषय बनवला. याचा जम्मु काश्मिरमुळे भारत आणि पाकमधील संबध ह १९४७ ते २०२१ पर्यंत कधी समन्वयाने तर कधी संघर्षाचे बनले अशा या भारत पाक संबधात सुधारणा करण्याबाबत सार्क संघटनेच्या भुमीकेचे अध्ययन आणि विश्लेषण प्रस्तुत शोध निबंधात करण्यात येणार आहे.

भारत पक संधाचे विशलेषण करतांना ते तीन पातळीवर करावे लागते. एक म्हणजे दोन्ही देशातील अंतर्गत परिस्थती ज्यात सुरक्षा, आर्थिक विकास राजकारण आणि लोकशाही, दुसरे म्हणजे उभय देशाचे शेजारील देशांशी संबध तिसरे म्हणजे महासत्तांचा आशियाची खंडात अमेरीका आणि चिनची अनेक बाबतीतील स्पर्धा ज्यात भारत आणि पाक यांचे हित संबध जोडले आहेत. भारत आणि पाक या उभय देशातील संबधात दोन्ही ही देश तेवढेच जबाबदार आहेत. भारत आणि पाक यांच्या कितीही स्पर्धा असलीतरी इतर देशांच्या गणतीत भारताचे स्थान अधिक महत्वाचे आहे. यान दुमत नाही. पाकला जवळचा मित्र चिन असलातरी त्यास भारताशी थेट वैर घेने परवडणारे नाही. कारण भारत आणि चिनला ९६ अॅढज डॉलर चा व्यापार या दोन देशांत आहे. दुसऱ्यांदा पंतप्रधान झालेल्या नरेंद्र मोदी यांनी ऑगस्ट २०२० मध्ये जम्मु काश्मिरसी संबधीत ३७० कलम रद केले आहे. अपेक्षितपणे भारताच्या या कृतीवर काही निवडक देशाकंडून तिवृ प्रतिक्रिया व्यक्त झाल्या.

३७० कलम रद्द झाले तरी भारत आणि पाकमध्ये संबध कायमचे सुधारतील अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. भारत आणि पाकमध्ये आजही जम्मु आणि काश्मिरच्या प्रश्नावरून अंतर्गत ताण तणाव संघर्ष होताना दिसून येते. सार्क संघटनेची स्थापणा ०८ डिसेंबर १९८५ मध्ये मालादेव, आणि २००७ मध्ये अफगाणिस्थान हा आठवा देश बनला. अर्थिक विकासासाठी, सामुहिक आत्मनिर्भरथा वाढवण्यासाठी, परस्परांन विश्वास आणि समस्या सोडवण्यासाठी

आर्थिक, सांस्कृतीक तांत्रिक, सामाजिक, वैज्ञानीक क्षेत्रात सहयोग वाढवण्यासाठी, निकसनशिल देशासोबत संबध मजबुत करण्यासाठी या उदात हेतुनी सार्क संघटनेची स्थापणा करण्यात आली ज्यावेळी, त्यावेळी भारत आणि पाक संबधात संघर्ष ताणतणाव निर्माण झाला. त्या त्या वेळी त्याचा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम संघटनेवर झाला. सार्कच्या घटनेनुसार सार्कची शिक्षर परीषद वर्षातुन एकदा होते. सार्कच्या शिखर परिषदेपुर्वी सार्कच्या सदस्य राष्ट्रच्या पराष्ट्र मंत्र्याची वर्षातुन दोनदा बैठका पार पडतात सदस्य राष्ट्रामध्ये भारत आणि पाकमध्ये सौदार्यपुर्ण संबध नाहीत. बांग्लादेश आणि पाकिस्तान मध्ये सिमेवरून संघर्ष आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात वाद आहे. भारत आणि श्रीलंकेत तांत्रिक प्रश्नावर मतभेद आहेत अशा विविध कारणांनी सार्कच्या सदस्य राष्ट्रामध्ये संबध हे समन्वयाचे आणि सौहाद पुर्ण दिसून येत नाहीत. यामुळे सार्कच्या बैटका संपन्न होताना पण निष्पण काही होत नाही. पाकिस्तान दहशतवाद्याना देत असलेल्या पाठिब्यामुळे आणि भारतात उरी येथील लश्करी तळावर झालेल्या हल्यानंतर भारत बांग्लादेश, भुतान आणि अफगानिस्थान या देशांनी नोव्हेंबर २०१६ मध्ये पाकमध्ये होणाऱ्या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे हि बैठक रद्द करण्यात आली होती. सदस्य देशांचा अंतर्गत वादाचा सार्कच्या कार्यावर परिणाम होवु नये म्हणुन सार्कच्या बैठकीत युध्द किंवा दोन देशातील संघर्ष यावर सहसा चर्चा होत नाही पण संबधीत देशांना या बैठकीच्या वेळी परस्पर चर्चा करण्याची संधी सार्क देते सार्क ही दक्षिण आशियातली आढ देशांची एकमेव संघटनेने भारत आणि पाकिस्तान मध्ये या उभय देशातील समस्या तणाव निवारणात महत्वाची भुमिका पार पाडावी ही सार्क अपेक्षा आहे. सार्क संघटनेच्या स्थापने नंतर भारत आणि पाकमध्ये १९९९ चे कारार्यत युध्द, २००१ या भारताच्या संसदेवरील हाला १९९९ चे विमान अपहरण, २००८ चा मुंबई वरील हला उरी, पुलवामा हाला याशिवाय नेहमी चालणाऱ्या सरहदीवरल चकमकी यातुन सामान्य नागरीक आणि सैनिकांचे बलिदान यामुळे भारत आणि पाकमध्ये संबध हे सुरक्षीत समन्वयाचे शांततेचे नव्हते म्हणुन भारत आणि पाकमध्ये संबध हे कायमचे तणावाचे संघर्षाचे राहील्याचे दिसुन येते.

फुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्यानंतर भारत आणि पाक या उभय देशामध्ये टोकाचा तणाव निर्माण झाला होता. अशा परिस्थितीत सार्कचे अध्यक्षपद सांभाळणाऱ्या नेपाळने दोनही राष्ट्रांना संयम पाळण्याचा सला दिला. सार्क ही दक्षिण अशियात आठ देशांची एकमेव आणि महत्वाची संघटना आहे. की ज्यात भारत आणि पाक हे दोघेही मोठे सदस्य आहेत. सार्क संघटना परसपर सहकार्यास चालना देण्यासाठी निर्माण झाली पण तसे अनुकूल वातावरण सदस्य राष्ट्रामध्ये निर्मान करण्यात सार्क संघटनेला अपयश आल्यामचे दिसून येते. भारत आणि पाकमधील तणावपूर्ण संबधामुळे दक्षिण आशियाई देशात शांतता, सुरक्षितता, परस्पर विश्वास, निर्माण करण्यात मर्यादा आल्या आहेत. सार्क सारख्या दक्षिण आशिया खंडातील एकमेव महत्वाचे व्यासपीठाच्या माध्यमातुन परस्परातील संघर्ष वाद, तणावाचे निराकरण होणे अपेक्षित होते. पण तसे झाल्याचे दिसून येत नाही. सार्क संघटनेच्या घटनेनुसार दोन सदस्य देशामधील वाद विवांदाची चर्चा सार्कच्या व्यासविठावर केली जाऊ शकत नाही त्यामुळे भारत आणि पाक संबध सुधारण्यात सार्क संघटनेला अपयश आल्याचे दिसून येते. पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांनी उरी फुलवामा सारखे दहशतवादी कृत्य घडवून आणले त्यावेळी सार्कच्या सर्व सदस्य राष्ट्रांच्या राष्ट्राप्रमुखांनी दहशतवादी कृत्याचा जाहीर निषेध केला. दहशतवाद हा दक्षिण आशियाई देशांचा समान शत्रु आणि समान प्रश्न आहे. असे माणुन जो पर्यंत दहश्तवादाच्या विरोधात लढा उभारणार नाहीत तो पर्यत दहशतवादाचा शेवठ होणार नाही.

दहशतवाद विरोधात सार्क संघटना कठोर भुमिका घेण्याची नितांत गरज आहे. सार्कने दक्षिण आशियातील दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी त्या विरोधात सामुहिक कश्ती करण्यासाठी Saarc Regional Louvention OnSuppe넣sssisn of Terroeism हा जाहिरनामा प्रसिध्द केला होता. दक्षिण आशियामधील देशांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने दहशतवादाशी सामना करण्यासाठी सार्क देशांनी परस्पर सहकार्याची भुमिका घेणे नितांत आवश्यक आहे. यामुळेच सार्क संघटनेची प्रस्तुता अबाधीत राहिल. ज्या उदात होऊन सार्क ही संघटना

स्थापण झाली त्या हेतुला वास्तवात साकारण्यासाठी सार्कने पुढाकार घेने महत्वाचे आहे. ज्यामुळे दक्षिण आशियाई देशांत शांतता आणि सुरक्षितता स्थिरता या बरोबराच भरत आणि पाकमध्ये शांतता आणि सुरक्षितता स्थिरता समन्वय निर्मान होईल सार्क ही संघटना ही ज्या हेतुने स्थापण झाली. तिची बहुतांश उदिष्ठये कागदोपत्रीच असल्याचे दिसून येते. सार्कच्या घटनेनुसार दरवर्षी शिखर परिषदा संपन्न होणे अपेक्षित आहे. परंतु सार्कच्या ३० वर्षाच्या इतिहासात केवळ १८ वेळा सार्क शिखर सम्मेलन संपन्न झाली. यातुनच सार्कचे अपयश प्रतिबिबिंत होते. सार्कने घेतलेल्या कोणत्याही निर्णयावर अंमलबजावणीची आवश्यक ती राजकिय इछाश्क्ती सदस्य राष्ट्र दाखवत नाहीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे Safta आणि दहशतवादा विरोधी ठराव, गरीबी निर्मुलन यावर एकमनाने निर्णय झाला परंतु त्याची अमंलबजावणी होताना दिसून येत नाही.

म्हणुन सार्कची मुख्य समस्या ही अमंलबजावणी आहे. अमंलबजाणीमध्ये मुख्य दोन अडथळे आहेत. एक भारत आणि पाकमधील राजकिय संघर्ष आणि दुसरे परस्पर अविश्वास आहे. सार्क या संघटनेत भारत आणि पाक हे दोन मोठे राष्ट्र आहेत. सार्कचे बहुतेक निर्णय हे पाकच्या हठशीपणामुळे पुर्णत्वास येवु शकली नाहीत हे वास्तव आहे. म्हणुन भारत आणि पाकमधील राजकिय संघर्ष ताणतणाव हे सार्कचा मोठा अडथळा असल्याचे दिसून येते अर्थात यावरून हे स्पष्ट होते की भारत आणि पाकच्या संबधावर सार्कची यशस्वीना अवलेकन आहे. सार्क संघटनेला आशियान आणि युरोपिअन महासंघाप्रमाणे यशस्वी व्हायचे झाल्यास परस्पर व्यापार वृध्दी यासाठी हवाईमार्ग रेल्वेमार्ग महामार्गाने या सदस्य राष्ट्रांना जोडयाची आवश्कता आहे. हवाई सेवा कार्यरत आहे. परंतु राजकिय प्रश्न ताणतणाव यामुळे हवाई सेवा वारंवार बंद केली जाते भारत आणि पाकचा उभय देशानी आपल्यातील मतभेद वाद विवाद संवादाच्या मार्गाने सोडून शांततामय सनदशिर मार्गाचा अवलब केल्यास दोन्ही राष्ट्रामध्ये मैत्रि पूर्ण सौहदा पुर्ण संबध निर्माण होतील. भारत आणि पाकमधील संबध सुधारल्यास आपोआपच सार्क स्तरच्या संघटनेची विकास यशस्वीता आणि विकास होऊन दक्षिण आशियाई देशांत शांतता सुरक्षितता सहकार्य समन्वय परस्पर विश्वास निर्माण होवुन विकासाला चालना मिळेल यात दुमत नाही.